13 SEP 2026

लोकमत

# डीवायपी विद्यापीठ तळसंदे येथे कायदा शिक्षण अभ्यासक्रम : गुप्ता

लोकमत न्यूज नेटवर्क

**नवे पारगाव :** कायदा क्षेत्रातील बदलत्या गरजा, तंत्रज्ञानाचा वाढता वापर व जागतिक स्तरावरील संधी लक्षात घेऊन तळसंदे येथील डी. वाय. पाटील कृषी व तंत्र विद्यापीठामध्ये 'स्कूल ऑफ लॉ' सुरू करण्यात आले आहे. बार कौन्सिल ऑफ इंडियाकडून यासाठी मंजुरी मिळाली आहे. आधुनिक, व्यावहारिक व मूल्याधिष्ठित कायदे शिक्षण देताना विद्यार्थ्यांमध्ये व्यावसायिक कौशल्य आणि सामाजिक जाणीव निर्माण करण्यावर 'स्कूल ऑफ लॉ'चा भर राहील, अशी माहिती कुलगुरू डॉ. ए. के. गुप्ता यांनी पत्रकार परिषदेत दिली.

गुप्ता म्हणाले, 'स्कूल ऑफ लॉ'मध्ये सध्या तीन वर्षांचा एलएल.बी. (हॉनर्स) व पाच वर्षांचा बी. ए. एलएल.बी. (हॉनर्स) या दोन पदवी अभ्यासक्रमांसाठी प्रवेश प्रक्रिया सुरू केली आहे. कोणत्याही मान्यताप्राप्त शाखेतील पदवीधर विद्यार्थ्यांना तीन वर्षांच्या एलएल.बी. अभ्यासक्रमासाठी, तर बारावी उत्तीर्ण विद्यार्थ्यांसाठी पाच वर्षांचा एकात्मिक बी.ए., एलएल.बी. अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेता येईल.

कुलसचिव डॉ. जे. ए. खोत यांनी प्रवेश प्रक्रियेबाबत माहिती दिली. 'स्कूल ऑफ लॉ'च्या प्रमुख डॉ. दीपश्री चौधरी म्हणाल्या, वकील, न्यायाधीश, कायदेविषयक सल्लागार, धोरण विश्लेषक, कॉर्पोरेट कायदे सल्लागार, लवाद तज्ज्ञ, प्राध्यापक व सार्वजनिक प्रशासन आदी क्षेत्रांमध्ये कायद्याच्या विद्यार्थ्यांसाठी करिअरच्या संधी उपलब्ध आहेत. (वा.प्र.)